-: महाराष्ट्र शासन:-
गृह विभाग
न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, कालीना, सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०० ०९८.
दूरध्वनी क्र. ०२२-२६६७ ०७५५/४१६५/०९६५ फॅक्स-०२२-२६६७ ०८४४
ई-मेल:- dir.fsl@maharashtra.govt.in Web :- dfsl.maharashtra.gov.in

---

## तपशीलवार जाहिरात क्र.२ (सन - २०१७ -१८)
## गट-ब व गट-क संवर्गातील पदांची सावधी करार पध्दतीने उमेदवारांची निवड करणे

---

गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एफएसएल-०४१७/प्र.क्र.१४९/पोल-४ दि.२३.०८.२०१७ व शासन निर्णय क्र.एफएसल-०४१७/प्र.क्र.२२३/पोल-४ दि.२३.०८.२०१७ अन्वये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय यांच्या आस्थापनेवर निव्वळ तात्पुरत्या तत्वावर १ वर्षापेक्षा कमी कालावधी साठी किंवा पदे नियमित तत्वावर भरण्यात येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत सावधी करार पध्दतीने खालील पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर पदांवर करण्यात येणाऱ्या नियुक्त्या संबंधित उमेदवारांचे काम समाधानकारक पूर्ण करण्याच्या अटींच्या अधीन राहतील. त्यानुसार विहित अर्हता धारण करणा-या उमेदवारांनी अर्जाचा नमुना **Annexure-I Download** करुन विहित नमुन्यात सर्व संबंधित प्रमाणपत्रांच्या स्वयंघोषित केलेल्या छायांकित प्रतींसह **दि.१६.१०.२०१७ ते ३१.१०.२०१७** या कालावधीत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) खालील नमूद केलेल्या ठिकाणी शीघ्र डाकव्दारे किंवा अन्य डाकव्दारे प्राप्त होतील अशा बेताने सादर करावेत, याची दक्षता घ्यावी. **तसेच विहित कालावधीनंतर प्राप्त झालेले अर्ज, अपूर्ण स्वरुपातील व आवश्यक कागदपत्रांच्या प्रतीं सादर न केलेले अर्ज आणि ई-मेल संदेशाव्दारे प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाही. तसेच व्यक्तीश: स्वयंहस्ते कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच विहित कालावधीनंतर डाकव्दारे किंवा अन्य माध्यमांमार्फत प्राप्त झालेल्या विलंबास संचालनालय जबाबदार राहणार नाही.**

**उपलब्ध पदसंख्या:-**

| अ. क्र. | पदनाम | प्रवर्ग निहाय पदे | | | | | | | | | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | |
| १ | सहायक रासायनिक विश्लेषक (गट- ब) | १४ | ७ | ३ | ३ | ४ | २ | २ | २० | ५६ | १११ |
| २ | वैज्ञानिक अधिकारी (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) (गट-ब) | ७ | ४ | २ | १ | २ | १ | १ | ९ | २७ | ५४ |
| ३ | वैज्ञानिक सहायक (गट-क) | १४ | ७ | ३ | ३ | ४ | २ | २ | २० | ५६ | १११ |
| ४ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) (गट-क) | ७ | ४ | २ | १ | २ | १ | १ | ९ | २७ | ५४ |

पात्रता :-

१. **वयोमर्यादा :-** दि.०१.१०.२०१७ रोजी खुला प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे असेल.

२. **शैक्षणिक अर्हता :-** दि.०१.१०.२०१७ रोजी किमान शैक्षणिक अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सहायक रासायनिक विश्लेषक (गट- ब) | विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र किंवा जीवरसायनशास्त्र किंवा न्यायसहायक विज्ञान या विषयाच्या कोणत्याही शाखेतील किमान व्दितीय श्रेणीतील मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी. |
| २ | वैज्ञानिक अधिकारी (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) (गट-ब) | विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र किंवा संगणकशास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती व तंत्रज्ञान या मुख्यविषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी किंवा अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती व तंत्रज्ञान विषयातील किमान व्दितीय श्रेणीतील पदवी किंवा MSc. (Digital and Cyber Forensic and IT Security) |
| ३ | वैज्ञानिक सहायक (गट-क) | विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र विषयासह मान्यताप्राप्त विद्यापीठाची कमीत कमी व्दितीय श्रेणीतील पदवी किंवा न्यायसहायक विज्ञान शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची कमीत कमी व्दितीय श्रेणीतील पदवी किंवा BSc.(Forensic Science) |
| ४ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) (गट-क) | विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र किंवा संगणकशास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा माहिती व तंत्रज्ञान या विषयासह किमान द्वितीय श्रेणीतील पदवी अथवा अभियांत्रिकी शाखेतील संगणकशास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती आणि तंत्रज्ञान विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी उत्तीर्ण किंवा B.sc. (Forensic Science ) किंवा Post Graduate Diploma in Digital and Cyber Forensic and Related Law. |

निवड पध्दती:- सर्व पदांसाठी

१. लेखी परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादीत करण्यासाठी एकूण प्राप्त झालेल्या अर्जांच्या छाननीनंतर उमेदवारांचे किमान शैक्षणिक अर्हतेच्या परीक्षेत संपादीत केलेल्या गुणवत्तेनुसार मंजूर प्रवर्गनिहाय पदांच्या दहापट याप्रमाणे चाळणी पध्दतीचा निकष राहील व त्यानुसार लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल.
२. सदर पदासाठी किमान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या परीक्षेत संपादीत केलेल्या गुणांच्या ५०% गुण (ग्रेड असल्यास सरासरी प्रमाणे) + लेखी परीक्षेतील प्राप्त गुण एकत्रित करून अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल.
३. लेखी परीक्षा (५० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल व त्यासाठी एक तासाचा वेळ देण्यात येईल) (माध्यम इंग्रजी)
४. लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम वरील पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या दर्जेनुसार राहील.
५. **लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी व परीक्षेचे वेळापत्रक याबाबतच्या सूचना www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. तसेच संबंधित उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेल संदेशाव्दारे कळविण्यात येईल. तथापि, त्यासंदर्भात कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. तरी वेळोवेळी संकेतस्थळावरील आणि ई-मेल संदेशावरील माहिती उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी वैयक्तिक उमेदवारांची राहील.**

६. लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची परीक्षा मुंबई येथे घेण्यात येईल. तसेच सदर निवडीसाठी कोणत्याही प्रकारची तोंडी मुलाखत घेण्यात येणार नाही.
७. भरण्यात येणारी एकूण पदसंख्या व आरक्षण शासन निर्णयानुसार देण्यात आलेली आहे.
८. अंतिम निवडयादीतील उमेदवारांची नियुक्ती प्रलंबित प्रकरणांची संख्या आणि त्या-त्या प्रयोगशाळेतील कामाची निकड विचारात घेऊन संचालनालयातील अधिपत्त्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नांदेड व कोल्हापूर प्रयोगशाळेत करण्यात येईल. तथापि, प्रयोगशाळेतील कामाच्या आवश्यकतेप्रमाणे संबंधित उमेदवारांना संचालनालयातील अधिपत्त्याखालील कोणत्याही प्रयोगशाळेत काम करणे बंधनकारक राहील, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**मासिक मानधन :-** गट-ब पदांसाठी एकत्रीत ठोक मानधान रु.२१,०००/-
गट-क पदांसाठी एकत्रीत ठोक मानधान रु.१८,०००/-

**परिक्षा शुल्क :-** निरंक

**महत्वाच्या विशेष सूचना:-**

१. अर्ज सादर करतांना उमेदवारांनी अलिकडील फोटो व मान्यताप्राप्त फोटो ओळखपत्र तसेच शैक्षणिक पात्रता, राखीव प्रवर्गासाठी आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रांच्या प्रतीं व अनुभवासंदर्भात आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रतीं, सक्षम प्राधिका-याने दिलेले रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. अर्जाचा नमुना **Annexure-I Download** करुन खालील ठिकाणी सर्व संबंधित प्रमाणपत्रांच्या स्वयंघोषित केलेल्या छायांकित प्रतींसह दि.१६.१०.२०१७ ते ३१.१०.२०१७ या कालावधीत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) प्राप्त होतील अशा बेताने सादर करावेत. **प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे बंधनकारक राहील. एकाच अर्जामध्ये एकापेक्षा अधिक पदांसाठी सादर केलेला अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतला जाणार नाही. अर्जामध्ये ई-मेल संदेश नमूद करणे बंधनकारक राहील. तसेच अर्ज सादर केलेल्या लिफाफ्यावर जाहिरात क्रमांक व पदाचे नाव नमूद करणे अनिवार्य राहील.**

| | | |
|---|---|---|
| मुंबई | : | न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, हंस भुग्रा मार्ग, विद्यानगरी, कालिना सांताक्रुझ (पूर्व) मुंबई- ४०० ०९८. दूरध्वनी क्र.०२२-२६६७०७५५ / ४१६५ / ०९६५ |
| नागपूर | : | प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, रहाटे कॉलनी चौक, धंतोली, नागपूर-४४००१२, दूरध्वनी क्र.०७१२-२४६२८७९-२०४२९७९ |
| पुणे | : | प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, गणेशखिंड, राजभवन समोर, पुणे-४११००७, दूरध्वनी क्र.०२०-२५६६७३२१-२२. |
| औरंगाबाद | : | प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, जुना निझाम बंगला, कॅन्टोनमेन्ट, औरंगाबाद-४३१००२, दूरध्वनी क्र.०२४०-२३७०३७५. |
| नाशिक | : | प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, विद्युत भवन समोर, किनारा अभियंता बिल्डींग, जलगती परीसर, मेरी, दिंडोरी नाका, नाशिक-४२२००४, दूरध्वनी क्र.०२५३-२६२०५७३. |
| अमरावती | : | प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, सामाजिक न्यायभवनच्या बाजूला पोलिस आयुक्त कार्यालयाच्या मागे, चांदुररेल्वे रोड अमरावती-४४४६०६, दूरध्वनी क्र.०७२१-२५५२५९२/२६९२ |

नांदेड : प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय इमारत (जुनी), दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय जवळ, वजीराबाद, नांदेड-४३१६०१ दूरध्वनी क्र.०२४६२-२३६६३१.

कोल्हापूर : प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, व्दारा-महाराष्ट्र जिवन प्राधिकरण इमारत,ताराराणी चौक, कावळा नाका, कोल्हापूर -४१६००१, दूरध्वनी क्र.०२३१-२५३५३६०-६१.

२. सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी नियुक्तीपासून १ वर्षापेक्षा कमी राहील व सदर उमेदवाराला कोणतीही पूर्वसूचना न देता विहित कालावधीनंतर त्यांची सेवा आपोआप संपुष्टात येईल. कराराचा कालावधी संपुष्टात येताच नियुक्ती संपुष्टात येईल.

३. सदर पदावरील नियुक्त्या हया निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असून मा.उच्च न्यायालय,मुंबई मधील रिट याचिका क्र.८५/२००८ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशातील तरतूदीनुसार करण्यात येतील.

४. निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी १०० रूपयांच्या बॉड पेपरवर सात दिवसांच्या आत करारनामा करावा लागेल. सदर करारनामाचा नमुना निवड झालेल्या उमेदवारांना देण्यात येईल. करारनामामधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

५. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांचे काम समाधानकारकरित्या सुरु राहील, या अटीच्या अधीन राहील. काम समाधानकारकरित्या पूर्ण न करीत असल्याचे आढळून आल्यास कोणतीही पूर्वसूचना/कारण न देता संबंधित उमेदवाराची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

६. प्रयोगशाळेच्या कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

७. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर स्थगिती / रदद करण्याचे अधिकार संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई यांना राहतील.

८. सेवायाजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनीदेखील या जाहीरातीनुसार अर्जासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ व साक्षांकित प्रतीसह अर्ज करणे आवश्यक आहे.

९. लेखी परीक्षेसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी ई-मेल संदेशाची प्रत, पोच पावतीची प्रत (असल्यास) व ओळखीच्या पुराव्यासाठी आधार कार्ड/पॅन कार्ड/ निवडणूक आयोगाचे ओळखपत्र/ पासपोर्ट इ.सोबत आणणे बंधनकारक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार सावधी करार पध्दतीवर ठोक मानधनावर नेमणूका करण्यात येतील. जाहीरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे.

२) अंतिम निवडयादीतील उमेदवारांनी नियुक्तीच्या प्रयोगशाळेत स्व:खर्चाने हजर राहून प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहील त्यासाठी इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

३) अर्ज विहित नमुन्यात सर्व दृष्टिने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४) पत्र व्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

५) निवड झालेल्या उमेदवारांना निव्वळ तात्पुरत्या तत्वावर १ वर्षापेक्षा कमी कालावधी करिता कंत्राटी पदधतीने ठोक मानधनावर नेमणूक करण्यात येईल. त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते मिळणार नाहीत.

६) लेखी परीक्षेसाठी निवड झालेल्या उमेदवारांना परीक्षेच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

७) महाराष्ट्र राज्याच्या रहिवाशांनाच मागसवर्गीय प्रवर्गाचे फायदे अनुज्ञेय राहतील.

८) सर्व मागासवर्गीय उमेदवारांनी जाती प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळेस सादर करावे.

९) अनुसूचित जाती व जमाती या प्रवर्गाचे उमेदवार वगळता इतर सर्व मागासवर्गीय जसे विजा/भज, विमाप्र व इमाव प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र) २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

१०) निवड झालेल्या उमेदवारांची पूर्व चारित्र पडताळणी करण्यात येईल.

११) उमेदवारास नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या गुन्हयात शिक्षा झाली असल्यास तो निवडीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरूध्द पोलिस चौकशी, न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

१२) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येऊन गुन्हा दाखल करण्यात येईल.

१३) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी असल्यास सदर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

स्वाक्षरी/-
(डॉ, कृ.वि.कुलकर्णी)
प्रभारी संचालक,न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, म.शा.
आणि शासकीय रासायनिक विश्लेषक

**Annexure -I**

**Directorate of Forensic Science Laboratories, Maharashtra State, Mumbai.**

**Application Form**

Self-attested recent passport size photograph of the candidate

**Name of post: -**

**Advertisement No. -**

1. a) Full Name (Surname first): --------------------------------------------------------
   b) Father/Husband full name: -------------------------------------------------------
   c) Full name before marriage (for female): ---------------------------------------------

2. Full Address : ------------------------------------------------------

3. Mobile Phone Number -: -------------------- Email ID * (Mandatory)- ----------------------

4. Sex male: [ ] female: [ ]

5. Caste: -----------------sub caste: -----------------Category : -----------------------
   Non Creamy layer issue date------------------------------

6 a) Birth Date: [ | ] Date [ | ] month [ | | | ] year
   b) Age as on 1st Oct. 2017 ---------- years ----------- month ------------- days

7. Educational Qualifications: (should be given from Degree onwards)

| Qualification | Board/ university | Marks detail | | | Certificate |
|---|---|---|---|---|---|
| | | Obtained marks | Total marks | Percentage (as per Degree) | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

8. Full Address of local police station : ---------------------------------------------------

9. Whether working in any organization? (If yes give details): YES/No

10. Whether the candidate worked previously with Directorate if yes
    Name of Laboratory ------------- Contract period ---------------

(Please tick √ for relevant information)

Declaration:- I hereby declare that I have read the advertisement/notification for this Post and read the information about the Post carefully. I accept it. I have assured for myself that I fulfill all the terms and conditions mentioned in the advertisement/ notification. All the information, provided in this application is true and correct to the best of my knowledge. I am aware that I will be liable for appropriate action (including loss of the job) if the information provided is found to be incorrect.

Yours faithfully,

Signature of applicant with name